जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय. दिनांक:- / /१९९०.

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग.]
जिल्हा परिषद, पुणे - ११.

13 AUG 1992

विषय:- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देण बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस -१०९२/(६३९८)/प्राशि -3 दिनांक.. 3/८/९२ चे पत्र.

उपरोक्त विषया संबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९२ पासून इयत्ता १ ली ते सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात प्रत्येक्ष सुरु असलेल्या वर्गासह या प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान ततवार "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनांव | शाळेचे नावं व ठिकाण | इयत्ता. | माध्यम. |
|---|---|---|---|
| डॉ. विखे - पाटील फौंडेशन. | पत्रकारनगर, भांबुर्डा पुणे | इ. १ ली ते १९९२-९३ या शैक्ष. वर्षात सुरु असलेल्या वर्गासह. | इंग्रजी. |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुबंई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांचे सोय केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमलां पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

[पान २ वर]

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परीणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबधीत संस्था, संस्था नोंदणी अधीनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबधीत संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबत या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

शेरा/-

प्रत:-

प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ पुणे-५
जिल्हा पुणे ------यांना माहिती व पुढील कार्यवाही साठी.

प्रत:- मा. सचिव डॉ. शिरके-प्रतिष्ठान, फौंडेशन, पुणे.

यांना माहितीसाठी अग्रेषित.

तात्काळ.

Rules

क्र.माध्य-२/[१४]नमाशा/मान्यता/पु.व ९२.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-
यांचे कार्यालय,
दि. 20 FEB 1992

प्रति,
सचिव,
~~डॉ. विखे पाटील फौंडेशन~~
पुणे

विषय :- सन. १९९१.९२ या शै.वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : मा.उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचेकडील पत्र क्र.एसएसएन/१०९१/२८८८/माशि-१ दिनांक ३.२.९२
~~३१ [illegible] १९९१ चे पत्र.~~

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९२ पासून विना-अनुदान तत्वावर/कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शार्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

[१] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन१०८८/१६६९-एन/माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विदयार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विदयार्थ्यांसाठी [ इ.बी.सी.च्या ] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित ~~[illegible]~~ त्वरीत या कार्यालयाकडे पाठवावी.

- 2 MAR 1992

Inward No. 288
Date. 07-03-92

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज]कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती]नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यांत येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण,इमारत,प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यकत्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा.शिक्षण संचालक,यांची पूर्व परवानगी,शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमा खाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्थे विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] ज्या संस्थानां परवानगी आदेश मिळाल्यानंतर शाळा सुरु करणे शक्य होणार नाही. अशा संस्थांनी १९९२-९३ पासून नूतणीकरणा बाबत ~~डिसेंबर ९१~~ फेब्रुवारी ९२ पूर्वी शिक्षणाधिकारी व या कार्यालया मार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

३/--

त्या बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रदद झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. विखे पाटील फौंडेशन पुणे | २७० भांडुर्डे पुणे शहर | इ.८ वी [आठवी] जून १९९१ पासून | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमा प्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी.

शिक्षणाधिकारी [माध्य] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नविन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थे विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी करुन आपल्या अभिप्राय तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र/खाप्राशा/ ६७७६ २००३-०४
दिनांक १४/3/2004

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
विखे पाटिल मेमोरियल स्कूल,
सेनापती बापट रोड, पुणे १६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२ (१०००/०२) प्राशि - ३ दिनांक २३. ०९. २००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया - वर्गांना सन २००३-०४ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे या २० रू. स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे माध्यम | वर्ग/ तुकडया मान्यता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी/~~मराठी~~ माध्यम | पहिली ते सातवीची निरसरी अतिरिक्त तुकडी. |

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

NO.NOC 2006/(44/06)/SE-1
School Education & Sports Department,
Mantralaya, Annexe, Mumbai-400 032
Date:- 4 / 2 /2006.

To,
The Secretary,
Central Board of Secondary Education,
Community Centre, Preet Vihar,
New Delhi.

Subject: Issue of No objection Certificate

Government of Maharashtra has No Objection for starting a school in C.B.S.E Section named as Vikhe Patil Memorial School , at Patrakar Nagar Road, Senapati Bapat Road, Pune-16 run by Dr. Vikhe Patil Foundetion, Pune , to affiliate to the Central Board of Secondary Education, on the conditions that the school shall abide by the rules and regulations stipulated in that behalf by the State Government

Yours faithfully,

Guttemani
4/2/06

( M .A. GUTTE )
Under Secrerary
Government of Maharashtra

Copy to:

1. The Director of Education, (Secondary and Higher SecondaryEducation), Maharashtra State,Pune
2. The Regional Deputy Director of Education, Pune.
3. Education Officer (Secondary), Z.P.Pune
4. The Secretary,Dr. Vikhe Patil Foundetion, Pune ,
5 S.F. SE-1.

sharma

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३
पुणे, दि. ११/११/०२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
विखे पाटील मेमोरियल स्कूल,
पुणे ५३.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ~~०२-०~~ ९३-९४.
~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~.

आपल्या डॉ. विखे पाटील फौंडेशन, पुणे या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित विखे पाटील मेमो. स्कूल, पुणे माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी ~~/इ. ९ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन ~~२००~~ ९२ - ~~२००~~ ९३ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/१०९२/९२-९३, दि. ३१/८/९२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन ~~२००~~ ९३ - ~~२००~~ ९४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून ~~२००~~ ९३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / ~~गट शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

~~ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]~~

खरी नक्कल.

J.N.H.
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे - १.**

Sd/- x x x
शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

Principal
Vikhe Patil Memorial School
Pune - 411 016

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमुन्यातील शिफारस पत्र [इंग्रजी व मराठी]

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. शाळा वार्षिक तपासणी अहवाल.

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली. ]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैर व्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्र दोन प्रतीत या कार्यालयात सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

Principal
Vikhe Patil Memorial School
Pune - 411 016.